सकाळ

सकाळ TODAY

• Registered • Date of Publication : बुधवार, ६ जुलै २०२२
• Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily.
• आर.एन.आय.-एम.ए.एच.एम.ए.आर/२००३/१०६७०, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०२१-२०२३.

सातारा, बुधवार, ६ जुलै २०२२



डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# तरुणांची खरी संपत्ती पुस्तकांत

## प्रा. रवींद्र कोकरे; कोरेगावात डी. पी. भोसले महाविद्यालयात पारितोषिक वितरण

**पळशी, ता. ५ :** तरुणांची खरी संपत्ती पैशांच्या पाकिटावरून नव्हे, तर पुस्तकांच्या कपाटावरून ओळखली जाते. पुस्तके मस्तक घडवतात. घडलेली मस्तके कोणापुढे नतमस्तक होत नाहीत आणि कोणाचे हस्तकही होत नाहीत. म्हणून या वयात पुस्तकांची सोथ सोडायची नसते, असे आवाहन प्रसिद्ध ग्रामीण कथाकार प्रा. रवींद्र कोकरे यांनी केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर होते. या वेळी संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठात सात पेटंट व संशोधन प्रॉडक्ट मिळवणारे डॉ. विजयसिंह सावंत हे एकमेव प्राचार्य ठरल्याबद्दल त्यांचे डॉ. शिवणकर यांनी अभिनंदन केले. कर्मवीरांच्या कष्ट आणि ज्ञानाचा वसा या महाविद्यालयाने सुरू ठेवल्याचे डॉ. मेनकुदळे यांनी सांगितले. साताऱ्यातील महाविद्यालयांच्या तुलनेत डी. पी. भोसले महाविद्यालय निकालात पुढे आणि सांस्कृतिक व शैक्षणिक बाबतीत अग्रेसर असल्याचे प्राचार्य डॉ. सावंत यांनी सांगितले. पेटंट व संशोधन क्षेत्रातील योगदानाबद्दल व रयत शिक्षण संस्थेचा 'यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांचा विशेष सत्कार झाला. डॉ. एस. डी. जाधव, डॉ. विनायक जमदाडे (पेटंट व संशोधन), डॉ. भगवान लोकडे, प्रा. राबन मुल्ला (राष्ट्रीय पुरस्कार), डॉ. बाळासाहेब चव्हाण (प्रोफेसर पद), डॉ. देवानंद सोनटक्के (ग्रंथोत्तेजक पुरस्कार), प्रा. डॉ. विजय कोष्टी (आंतरराष्ट्रीय शोधनिबंध), डॉ. सिराज शेख (राष्ट्रीय पुरस्कार), प्रा. बाळकृष्ण भोसले (लेफ्टनंट कप्तान) प्रा. संगीता उबाळे (मॅरेथॉन विजेता), प्रा. सचिन निकम, प्रा. भरत गायकवाड, प्रा. संभाजी सकुंडे, प्रा. शरद जाधव (गुणवंत शिक्षक पुरस्कार), सुधाकर गायकवाड (गुणवंत सेवक) यांच्यासह गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार झाला. प्रा. सी. बी. जावळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. एस. गायकवाड यांनी आभार मानले.




**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलताना प्रा. रवींद्र कोकरे. त्या वेळी डॉ. विठ्ठल शिवणकर, डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. विजयसिंह सावंत, डॉ. एस. डी. जाधव, एस. एन. कोळेकर आदी.**